## बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर येथील तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

## नियमित दिवाणी दावा क्र. ६९८/२०२२

सौ. सुमन अशोक भोळ ..... वादी

विरुध्द

श्री. बब्रुद्दीन दौलत मुलाणी ..... प्रतिवादी

व इतर.

## निशाणी क्र.५ वरील आदेश

१. सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश ३९, आदेश १ व २ अन्वये तात्पुरती मनाई हुकुम मिळणेकरीता दाखल करण्यात आला आहे.

दावा मिळकती-

२. **१.** डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौज देवगांव हद्दीतील जमिनीचे वर्णनः–

शेतजमीन गट क्र. १७/३ याचे क्षेत्र ०१ हे. ००आर, आकार ०२ रु. ८० पै. यासी चतुःसिमा पुर्वेस – गट क्र. १७/४, दक्षिणेस खाजगी रस्ता, पश्चिमेस प्रतिवादी यांचे क्षेत्र, उत्तरेस गट क्र. १७/२ येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक जमीन यामध्ये एक चालू पाण्याची विहीर आतील झाडझुडूप वगैरे तदंगभूत वस्तूंहक्कासह.

**२.** डि सोलापूर सब डि व ता. बार्शी पैकी मौज देवगांव हद्दीतील जमिनीचे वर्णनः–

शेतजमीन गट क्र. २० याचे क्षेत्र ०१ हे. ५६ आर, आकार ०४ रु. ८० पै. यासी चतुःसिमा पुर्वेस – वादीचे क्षेत्र, कांदलगाव व गाडेगांव शिव रस्ता, पश्चिमेस गट क्र. २१, उत्तरेस ओढा. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक जमीन यामध्ये एक चालू पाण्याची विहीर आतील झाडझुडूप वगैरे तदंगभूत वस्तूंहक्कासह.

(यापुढे सदर मिळकतींना 'दावा मिळकती' असे संबोधले जाईल.)

३. प्रस्तुत अर्जामध्ये वादीने प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी स्वतः अगर इतरांमार्फत वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीमध्ये असलेला बांध टोकरु नये, चारी खांदून पाणी सोडू नये, अतिक्रमण करु नये म्हणून त्यांचे विरुध्द तुतातुर्त ताकीदीचा हुकूम प्रतिवादी क्र. १ ते १० यांचे विरुध्द व्हावा अशी विनंती केली आहे.

४. सदर प्रकरणामध्ये प्रतिवादी क्र. १ ते ४, प्रतिवादी क्र. ६ ते ८ व १० हे दाव्यामध्ये हजर झाले असून त्यांनी सदर दाव्यास कैफियत व प्रस्तुत अर्जास म्हणणे (नि. क्र. १५) दाखल केले आहे. तसेच सदर कैफियतमध्ये प्रतिवादींनी प्रतिदावा दाखल केला आहे. वादीतर्फे सदर प्रतिदाव्यास म्हणणे (नि. क्र. २०) दाखल करण्यात आले आहे. वादीने त्यास प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ५ व ९ यांचे विरुध्द चालविणेचा नाही अशी पुरसीस (नि. क्र. २२) दाखल केली आहे.

५. वादीतर्फे विधीज्ञ श्री. पी. एस. साखरे यांचा व प्रतिवादी क्र. १ ते ४ व ६ ते ८ व १० यांचेतर्फे विधीज्ञ श्री. आर. यु. वैद्य यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादीतर्फे दाखल लेखी युक्तिवादाचे अवलोकन केले.

६. उभय पक्षांचे वादपत्रांचे व वादकथनांचे अवलोकन केले. वादीतर्फे कागदपत्रे (नि. क्र. ४, नि. क्र. २९) व प्रतिवादीतर्फे कागदपत्रे (नि. क्र. ३१) चे अवलोकन केले.

७. माझे अवलोकनार्थ मुद्दे व त्यावरील निष्कर्ष हे त्यापुढे दर्शविल्याप्रमाणे कारणमिमांसेसह नोंदविले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | वादीस प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २) | वादी हे सिध्द करतात काय की, न्यायाचा समतोल त्यांच्या बाजुने आहे ? | होकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३) | वादी हे सिध्द करतात काय की, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे ? | होकारार्थी |
| ४) | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ करिता

८. प्रस्तुत दावा वादीने प्रतिवादी विरुध्द नुकसान भरपाई मिळणेकरीता तसेच आज्ञार्थी व निरंतर ताकीदीकरीता दाखल केला आहे.

९. वादीचे कथन असे की, दावा मिळकत क्र. १ ही वादीची मालकी कब्जे वहिवाटीची असून दावा मिळकत क्र. २ ही प्रतिवादींची समाईक मिळकत आहे. दावा मिळकत क्र. २ ही दावा मिळकत क्र. १ चे पश्चिमेस आहे. सदर दोन्ही मिळकतींचे मध्ये सर्वे नंबरचा पाच ते सात फुट रुंदीचा दक्षिणोत्तर चालीचा बांध आहे. वादीचे कथनाप्रमाणे सदर बांध हा सामाईक बांध आहे. याउलट, प्रतिवादींचे कथन असे की, वादी व प्रतिवादी यांचेदरम्यान असलेला बांध हा प्रतिवादींचे स्वतंत्र मालकी हक्काचा बांध आहे. त्याचेशी वादीचा कोणताही संबंध नाही. याठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, उभय पक्षांचे कथनावरुन वादी व प्रतिवादी यांचे मिळकतींमध्ये बांध आहे ही बाब वादग्रस्त नाही, असे दिसून येते.

१०. उभय पक्षांच्या कथनांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीतर्फे गट क्र. १७/३ व गट क्र. २० या दोन्ही मिळकतींचे ७/१२ उतारे दाखल करण्यात आले आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये उभय पक्षामध्ये दावा मिळकतींचे मालकीबाबत वाद नाहीत. वादीतर्फे मौजे देवगांव येथील गट क्र. ११ ते २० चा नकाशा (नि. क्र. ४/४) दाखल करण्यात आला आहे. सदर नकाशावरुन गट क्र. १७ चे पश्चिम

बाजूस गट क्र. २० असल्याचे दिसून येते.

११. वादीचे कथन असे की, प्रतिवादी हे सदर बांध टोकरणे, वादीच्या मिळकतीत अतिक्रमण करणे असे कृत्य करीत आहेत. दि. ०६/१०/२०२२ रोजी प्रतिवादींनी पुर्वी असलेल्या पाण्याच्या नैसर्गिक प्रवाहात पत्र्याचे मोठे शेड मारुन सदरचा नैसर्गिक मार्ग बंद करुन त्यांचे शेतातील पाणी हे वादीच्या मिळकतीमध्ये सोडले. त्यामुळे वादीचे सोयाबीन पिकाचे नुकसान झाले आहे. वादीने त्याबाबत विचारणा केली असता प्रतिवादींनी वादीस शिवीगाळ केली. याबाबत वादीने बार्शी तालुका पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंदवला आहे. तसेच तहसिलदार, बार्शी यांचेकडे अर्ज देखील दिला आहे.

१२. वादीतर्फे विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, वादीने प्रतिवादी यांनी बांध टोकरला आहे हे दर्शविण्याकरीता छायाचित्रे दाखल केली आहेत. तसेच तहसिलदार यांचे समोरील कार्यवाहीतील स्थळ पंचनाम्याचे अवलोकन केले असता त्यामधून देखील उभय पक्षांचे दरम्यान असलेला बांध फोडण्यात आला आहे हे निष्पण्ण होते. सदर बांध हा प्रतिवादींनी फोडला असून त्यांनी पुन्हा असे कृत्य करु नये म्हणून त्यांचे विरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यात यावा.

१३. याउलट प्रतिवादीचे कथन असे की, गट क्र. २० चे पश्चिम बाजूकडील गट क्र. २१ ते ३० या गटातील पाणी गट क्र २० मध्ये येवून पुर्व बाजूस १७ मध्ये जाते ही पाण्याची पुर्वापार वहिवाट आहे. वादीने सदर बांधावर माती व दगड टाकून त्यामध्ये रस्त्यास अडथळा केला. याबाबत प्रतिवादीने तहसिलदार, बाार्शी यांचेकडे वादीने अडवलेला रस्ता व पाण्याची वहिवाट खुली करुन मिळावी यासाठी अर्ज केल्यानंतर वादीने सदर अर्जास शह देण्याकरीता प्रस्तुत दावा दाखल केला आहे.

१४. प्रतिवादीतर्फे विधीज्ञांनी युक्तिवाद केला की, तहसिलदार, बार्शी यांनी क्र. जमा–२/ओढा५/एसआर/१०४/२०२२ व क्र. जमा –२/रस्ता५/एसआर/४१/ २०२३ या प्रकरणांमध्ये दि. १८/४/२०२४ रोजी आदेश पारीत केला आहे. वादीतर्फे

दाखल अर्जातील आदेशाचे अवलोकन केले असता पस्तुत दाव्यातील व सदर अर्जातील कारण (cause of action) हे वेगळे आहे. त्यामुळे वादीची दाव्यातील व प्रस्तुत अर्जातील कथने ही बनावट आहेत.

१५. उभय पक्षाचे वाद कथनांवरुन असे दिसून येते की, दोन्ही पक्षांनी तहसिलदार, बार्शी यांचेकडे दावा मिळकती संदर्भात अर्ज दाखल केले आहेत. प्रतिवादीतर्फे तहसिलदार, बार्शी यांचे आदेश, कागदपत्रे यादी (नि. क्र. ३१) लगत दाखल करण्यात आले आहेत. सदर दोन्ही आदेशांचे अवलोकन केले. सदर दोन्ही आदेशातील अर्जदारांची मागणी, त्यामधील कारणमीमांसा व पारीत केलेला आदेश यामध्ये प्रथमदर्शनी सुसंगती आढळून येत नाही. अशा परिस्थितीत सदर आदेशांवर विसंबून प्रस्तुत अर्ज निर्णायक करणे उचित होणार नाही. परंतु सदर कार्यवाहीदरम्यान करण्यात आलेला स्थळ पाहणी पंचनामा हा प्रस्तुत अर्ज निर्णायक करण्याकरीता उपयुक्त आहे.

१६. वादीतर्फे मंडल अधिकारी यांनी केलेला चौकशी अहवाल (नि. क्र. ४/११) दाखल करण्यात आला आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, मंडल अधिकारी, बार्शी यांनी तहसिलदार बार्शी यांना दि. १२/०९/२०२२ रोजी पत्राद्वारे कळविले की, गट क्र. १७ व २० मधून मोठा बैलगाडी बांध असून वादी व प्रतिवादी दोघे सदरचा बांध एकमेकांनी फोडला आहे असे कथन करत आहेत. सदर अहवालातील वादीचे जबाबाचे अवलोकन केले असता वादीने प्रतिवादीने बांध फोडला आहे असा जबाब तलाठी व मंडल अधिकारी यांचेसमक्ष दिला असल्याचे दिसून येते. सदर अहवालातील दि. ०८/०९/२०२२ रोजीचे पंचनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, स्थळपाहणी पंचनाम्यावेळी गट क्र. १७/३ व गट क्र. २० या दोन्ही मिळकतीमध्ये सोयाबीनचे पीक आहे. तसेच सदर दोन्ही मिळकतीमध्ये जुना मोठा बांध आहे. सदर प्रकरणातील गैरअर्जदार उत्तरेकडील बांधालगत असलेल्या दक्षिणोत्तर दोन गटांचे मधील बांध हा फुटलेल्या अवस्थेत दिसून आला व गट क्र. २१, २२, २३ व ३० मधील येणारे पावसाचे पाणी गट क्र. २० मधून पुढे पुर्वेकडे जात असल्याचे दिसून आले. सदर पंचनाम्याप्रमाणे दि. ०८/०९/२०२२ रोजी वादी व प्रतिवादी यांचे

मिळकतीमधील बांध फुटलेल्या अवस्थेत दिसून आला होता. प्रस्तुत दाव्यामध्ये व अर्जामध्ये वादीचे कथन असे की, प्रतिवादीने दि. ०६/१०/२०२२ रोजी पुर्वापार पाण्याचे वहिवाटीमध्ये अडथळा निर्माण करुन बांध फोडून वादीचे जमिनीमध्ये पाणी सोडले. सदर पंचनाम्यातील वर्णन व दाव्याचे कारण ध्यानात घेता बांध नेमका कधी फोडण्यात आला याबाबत तफावत आहे. परंतु सद्यस्थितीस सदर दोन्ही घटना ध्यानात घेता वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीमधील बांध फुटलेला आहे ही बाब स्पष्ट दिसून येते.

१७. वादीचे कथन असे की, सदर बांध प्रतिवादींनी फोडला आहे. प्रतिवादींनी वादीचे कथन नाकारले आहे. प्रतिवादींचे कथन असे की, गट क्र. २० मधील पाणी पुर्वेकडे गट क्र. १७ मध्ये जाते तशी पाण्याची वहिवाट पुर्वापार आहे. वादीतर्फे सदर बांधावरील छायाचित्र (नि. क्र. २९/१ व ४/१०) दाखल करण्यात आले आहे. सदर छायाचित्रांचे अवलोकन केले असता सदर बांध चारी खांदून फोडण्यात आला आहे असे दिसून येते. तसेच अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे व छायाचित्रांचे अवलोकन केले असता प्रतिवादी कथीत करीत असल्याप्रमाणे ती पाण्याची पुर्वापार वहिवाट आहे असे दिसून येत नाही. उपरोक्त चर्चिलेप्रमाणे सदर बांध फुटल्यामुळे प्रतिवादी यांचे जमिनीतील पाणी वादीचे जमिनीमध्ये गेल्याचे दिसून येते. तसेच प्रतिवादी पाण्याची तीच पुर्वापार वहिवाट असल्याचे कथन करीत आहेत. अशा परिस्थितीत सदर बांध प्रतिवादींनी फोडला आहे याची शक्यता नाकारता येत नाही.

१८. याठिकाणी हे नमुद करणे जरुरीचे की, वादीने शपथपत्र दाखल करुन कथन केले आहे की, सदर बांध हा प्रतिवादी यांनी टोकरुन चारी खांदून त्यांचे शेतातील पाणी वादीचे शेतामध्ये सोडले आहे. या कथनाचे पुष्टयर्थ वादीने बार्शी तालुका पोलीस स्टेशन येथे दाखल केलली अदखलपात्र गुनहयाचा अहवाल (नि.४/१०) ची प्रत देखील दाखल केली आहे. त्यामुळे वादीची कथने, दाखल कागदपत्रे व उपरोक्त कारणमीमांसा यावरुन सद्यस्थितीस सकृतदर्शनी सदर बांध हा प्रतिवादींनी फोडला आहे असे दिसून येत आहे.

१९. प्रतिवादींचे कथन असे की, वादीने गट क्र. २० चे प्रतिवादींचे मालकीचा असलेल्या स्वतंत्र बांधावरील रस्त्यावर माती व दगड टाकून प्रतिवादीचे रस्त्यास तसेच पाण्याचे वहिवाटीस हरकत अडथळा केला आहे. तसेच प्रतिवादीतर्फे वादपत्रामध्ये कथन करण्यात आले की, त्यांनी यासंदर्भात पोलीस स्टेशन येथे देखील तक्रार नोंद केली आहे. परंतु प्रतिवादीतर्फे सदर तक्रारी अर्ज अथवा अहवाल या प्रकरणामध्ये दाखल करण्यात आला नाही. महत्वाची बाब म्हणजे प्रतिवादीतर्फे सदर बांध हा प्रतिवादींचे स्वतंत्र मालकीचा आहे हे दर्शविण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आला नाही. तसेच वादीने त्यांचे रस्त्यावरील व पाण्याचे वहिवाटीस हरकत अडथळा केला आहे हे दर्शविण्याकरीता देखील प्रतिवादीतर्फे आवश्यक कागदापत्रे दाखल करण्यात आले नाहीत. अभिलेखावर दाखल स्थळ पाहणी पंचनामा व तहसिलदार यांचे आदेश यावरुन देखील वादीने सदर बांधवर कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण केला आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे वादीने प्रतिवादींचे सदर बांधावरील रस्त्यास व वहिवाटीस हरकत अडथळा केला आहे असे सकृतदर्शनी दिसून येत नाही.

२०. अशा परिस्थितीत अभिलेखावरील दाखल कागदपत्रे व उभय पक्षांची वाद कथने यावरुन वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीमध्ये बांध आहे तसेच तो फुटलेल्या अवस्थेत आहे असे दिसून येते तसेच सदर बांध फुटल्यामुळे गट क्र. २१, २२, २३ व ३० मधील येणारे पावसाचे पाणी गट क्र. २० मधून पुढे पुर्वेकडे म्हणजे वादीच्या मिळकतीमध्ये गेले असल्याचे देखील दिसून येते. तसेच उपरोक्त चर्चिलेप्रमाणे सदर बांध चारी खांदून फोडला असून तो प्रतिवादींनी फोडला आहे असे प्रथमदर्शनी दिसून येते. तसेच प्रतिवादी सदर बांधावरील वादीचा हक्क देखील नाकारत आहेत. अशा परिस्थितीत प्रतिवादी वादीस त्यांचे मिळकतीमध्ये असलेल्या बांधाचे संदर्भात हरकत अडथळा करत आहेत असे दिसून येते. उपरोक्त कारणमीमांसा ध्यानात घेता वादीने वादपत्रातील तिची कथने सकृतदर्शनी शाबीत केली आहेत. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये पाण्याचे वहिवाटीवरुन व त्यांचे मिळकतीमधील बांधाचे वहिवाटीवरुन वाद असल्याचे दिसून येते. सदर वाद दावा निर्णायक करुन संपुष्टात आणणे जरुरीचे आहे. त्यामुळे उपरोक्त सर्व विवेचन ध्यानात घेता वादीस प्रतिवादीं विरुध्द प्रथमदर्शनी केस आहे असे शाबीत होते. म्हणून मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष

होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दे क्र. २ व ३ करीताः</u>–**

२१. वादीचे कथन असे की, प्रतिवादीने सदर बांध टोकरल्यामुळे व फोडल्यामुळे वादीचे शेतातील सोयाबीन पिकाचे अतोनात नुकसान झाले आहे. प्रतिवादीने सदर बांध टोकरुन अतिक्रमण करुन त्रास देत असल्याने त्याचे विरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यात यावा अन्यथा वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट प्रतिवादीचे कथन असे की, सदर बांध प्रतिवादींनी फोडलेला नाही. सदर ठिकाणी पाण्याची पुर्वापार वहिवाट आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादीं विरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत करता येणार नाही.

२२. उभय पक्षाची कथने ध्यानात घेता हे नमुद करणे जरुरीचे की, उपरोक्त चर्चिलेप्रमाणे वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीमधील बांध प्रतिवादींनी फोडला आहे असे दिसून येते. तसेच त्यामुळे प्रतिवादींचे मिळकतीमधून वादीचे मिळकतीमध्ये पाणी आल्यामुळे वादीचे मिळकतीमधील पिकाचे नुकसान झाले आहे असे वादीचे कथने व दाखल छायाचित्राआधारे सकृतदर्शनी दिसून येते. अशा परिस्थितीत प्रतिवादींची कृत्ये चालू राहिल्यास निश्चितच वादीचे पिकाचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. तसेच वादीची गैरसोय देखील होणार आहे. याउलट छायाचित्रांवरुन सदर बांध फुटला आहे ती पुर्वापार पाण्याची वहिवाट आहे असे दिसून येत नाही. अशा परिस्थितीत उभय पक्षांचे वादाचे स्वरुप ध्यानात घेता प्रतिवादीं विरुध्द त्यांनी बांध टोकरु नये, चारी खांदून वादीचे मिळकतीमध्ये पाणी सोडू नये असा आदेश पारीत केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सदर प्रकरणामध्ये उभय पक्षातील वादाचे स्वरुप ध्यानात घेता न्यायाचा तराजू हा देखील वादीचे बाजूने झुकत आहे. त्यामुळे सदर कारणमीमांसा ध्यानात घेता मुद्दा क्र. २ व ३ चा निष्कर्ष मी होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्र. ४ करीताः</u>–**

२३. प्रस्तुत अर्जामध्ये वादीस प्रतिवादीं विरुध्द प्रथमदर्शनी केस आहे असे दिसून येते. तसेच वादीने मागणी केलेप्रमाणे प्रतिवादींविरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत

न केल्यास वादीचे कधीही न भरुन येणारे नुकसान होणार असून वादीची गैरसोय होणार आहे हे देखील सकृतदर्शनी शाबीत केले आहे. अशापरिस्थितीत वादी प्रतिवादीं विरुध्द तात्पुरता मनाई आदेश मिळणेस पात्र आहे.

२४. सदर अर्जामध्ये वादीने प्रतिवादींनी वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीमध्ये असलेला बांध टोकरु नये, चारी खांदून पाणी सोडू नये व अतिक्रमण करु नये असा तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यात यावा अशी विनंती केली आहे. परंतु वादीने प्रतिवादी वादीचे मिळकतीमध्ये अतिक्रमण करीत आहेत असे सकृतदर्शनी शाबीत केले नाही. त्यामुळे अतिक्रमणाबाबत त्यांचे विरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत करणे उचित होणार नाही. तसेच वादीने प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्र. ५ व ९ यांचे विरुध्द चालविणेचा नाही अशी पुरसीस (नि. क्र. २२) दाखल केली आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ५ व ९ यांचे विरुध्द तात्पुरता मनाई आदेश पारीत करणे उचित होणार नाही. अशा परिस्थितीत उपरोक्त सर्व कारणमीमांसा ध्यानात घेता प्रस्तुत अर्ज अंशतः मंजूर करणे उचित होईल. त्याप्रमाणे मुद्दा क्र.४ च्या उत्तरार्थी खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १ | प्रस्तुत अर्ज (नि. क्र.५) अंशतः मंजूर करण्यात आला. |
| २. | दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९, नियम १ प्रमाणे प्रतिवादी क्र. १ ते ४, प्रतिवादी क्र. ६ ते ८ व १० यांनी अथवा त्यांचे मार्फत इतरांनी दावा निकाली होईपर्यंत वादी व प्रतिवादी यांचे मिळकतीमध्ये असलेला बांध टोकरु नये व चारी खांदून पाणी सोडू नये असा तात्पुरता मनाई आदेश पारीत करण्यात आला.<br>(खुल्या न्यायालयात अधिघोषित) |

HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Digitally signed by HARSHADA UMATAI UTTAM PATIL
Date: 2025.08.21 16:49:33 +0530

( श्रीमती ह. उ. उ. पाटील )

दिनांक २०/०८/२०२५. तिसरे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, बार्शी

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order is same word to word as per the original Judgment / Order.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | A. A. Chavan. |
| (b) | Court | : | Smt. H. U. U. Patil, 3rd Jt. Civil Judge, J.D.& J.M.F.C.Barshi |
| (c) | Judgment /Order signed by P.O. on | : | 20/08/2025 |
| (d) | Judgment /Order uploaded on | : | 21/08/2025 |